**शासनाच्या निधीतून बांधण्यात येणारी विविध विभागांची विश्रामगृह/अतिथीगृहातील कक्ष सर्व विभागांच्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना शासकीय दौऱ्यादरम्यान <u>अनुज्ञयतेनुसार उपलब्ध करुन देण्याबाबत...</u>**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक:-संकिर्ण-२०२५/प्र.क.११३/राशि-२,**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: २७ मार्च, २०२६.

<u>**वाचा**</u>:- १) शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र.आरक्षण-२००२/प्र.क्र.१२६/मि.व्य.-२, दि.३१.०७.२००३.
२) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि.१६.०७.२०२५ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

<u>**प्रस्तावना:-**</u>

मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.१६.०७.२०२५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये शासनाच्या निधीतून बांधण्यात येणारी विविध विभागांची विश्रामगृहे सर्व शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना शासकीय दौऱ्यादरम्यान अनुज्ञयतेनुसार उपलब्ध करुन देण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

त्यानुसार सर्व शासकीय, निमशासकीय, अनुदानित संस्था, स्वायत्त संस्था, महाविद्यालये, विद्यापिठे (शैक्षणिक/कृषी) यांच्याकडे शासनाच्या निधीतून विश्रामगृहाचे /अतिथीगृहाचे बांधकाम केलेले असल्यास, सदर विश्रामगृह/अतिथीगृहातील उपलब्ध कक्ष, शासकीय कामानिमित्त दौऱ्यावर येणाऱ्या सर्व विभागाच्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्याकरिता उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

महाराष्ट्र शासनाच्या अधिकारी/कर्मचारी यांना शासकीय कामानिमित्त राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये तसेच इतर ठिकाणी दौऱ्यावर जावे लागते. अशा ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाचे विश्रामगृह नसल्यास किंवा विश्रामगृह उपलब्ध असून कक्ष शिल्लक नसल्यास सदर अधिकारी/कर्मचारी यांच्या निवासाची गैरसोय होते. यास्तव राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय, अनुदानित संस्था, स्वायत्त संस्था, महाविद्यालये, विद्यापिठे (शैक्षणिक/कृषी) यांच्याकडे शासनाच्या निधीतून विश्रामगृहाचे /अतिथीगृहाचे बांधकाम केलेले असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (कार्यासन मि.व्य-२) अधिनस्त विश्रामगृहाचे आरक्षण ज्या शासन निर्णयातील निर्देश/सूचनांनुसार करण्यात येते. त्याच शासन निर्णयातील निर्देश/सूचनांनुसार उपरोक्त संस्थांच्या अधिनस्त विश्रामगृहाचे आरक्षण होणे आवश्यक आहे. **त्यानुषंगाने, सर्व शासकीय, निमशासकीय, अनुदानित संस्था, स्वायत्त संस्था, महाविद्यालये, विद्यापिठे (शैक्षणिक /कृषी) यांच्याकडे शासनाच्या निधीतून विश्रामगृहाचे /अतिथी गृहाचे बांधकाम केलेले असल्यास, सदर विश्रामगृहे /अतिथी गृहातील उपलब्ध कक्ष, शासकीय कामानिमित्त राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये तसेच इतर ठिकाणी दौऱ्यावर येणाऱ्या सर्व शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्याकरिता उपलब्ध करुन देण्यात यावेत.**

२. सर्व संबंधित विभागांना सुचित करण्यात येते की, त्यांनी आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व विश्रामगृहांमध्ये शासनाच्या अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता अनुज्ञेयतेनुसार कक्ष आरक्षित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत त्यांच्या अंतर्गत संबंधित कार्यालयांना योग्य ते निर्देश द्यावेत.

३. संबंधित विभागांनी त्यांच्या अंतर्गत असलेल्या विश्रामगृहांची माहिती वेळोवेळी संबंधित जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध करुन देण्यात यावी.

४. सर्व संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाने याबाबत वेळोवेळी आढावा घेऊन योग्य तो समन्वय साधावा.

५. तसेच उक्त विश्रामगृहे/अतिथी गृहे यांचे आरक्षण सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि.३१.०७.२००३ रोजी व तद्नंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील अटी व शर्तीनुसार करण्यात यावे.

६. उपरोक्त बाब सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिनस्त सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, अनुदानित संस्था, स्वायत्त संस्था, महाविद्यालये, विद्यापिठे (शैक्षणिक /कृषी) यांना अवगत करण्यात यावे.

७. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०३२७१५१७२३०१०७ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,**

CHANDRAKANT KRISHNA MORE

Digitally signed by CHANDRAKANT KRISHNA MORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTM, 2.5.4.20=11AC200219EDB36F7777EE1101657BEA427109026722812 2B638D6F2CDEDAD62, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2314CF333E070F9936792BC95890FA89B2F617A931B2B577B703FA858F3DF433, cn=CHANDRAKANT KRISHNA MORE
Date: 2026.03.27 15:18:14 +05'30'

**( चंद्रकांत कृ. मोरे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.उपमुख्यमंत्री (रा.ऊ.शु., क्री.व यु. क.,अ.स.क.,औ.का.फ.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
६) मा. सभापती विधान परिषद / मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे सचिव, विधानभवन, मुंबई.
७) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई.
८) सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) सचिव (राजशिष्टाचार, परकीय थेट गुंतवणूक, परदेशस्थ नागरिकांचे विषय आणि संपर्क) तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१०) सर्व संबंधीत अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
११) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ, विधान भवन मुंबई.(पत्राने )
१२) सर्व विभागीय आयुक्त.
१३) सर्व जिल्हाधिकारी.
१४)प्रोथोनोटरी अँड सिनिअर मास्टर, उच्च न्यायालय, मुंबई. (पत्राने)
१५) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिलेट साईट, मुंबई.
१६) संचालक (वृत्त), माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१७) निवडनस्ती.